# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government ofMaharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

**Dr. Naresh M. Madavi**
**Director(I/c.)**
**Ph. No. - 07132-223320**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
**Email :** nssdsw.gug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/NSS/ 613 /2019** **Dt : 01/02/2019**

**प्रति,**
मा. प्राचार्य / विभाग प्रमुख,
गोंडवाना विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय:** १५ व्या राज्यस्तरीय गांधी विचार अभ्यास शिबीरासाठी विद्यार्थी पाठविण्याबाबत.

**संदर्भ:** जा.क्र.मगांअके / शिबीर / २०१८–१९ / १३२९ दि. १५ जानेवारी २०१९.
जा.क्र.मगांअके / शिबीर / २०१८–१९ / १३३४ दि. १५ जानेवारी २०१९.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयांकीत संदर्भान्वये आपणांस कळविण्यात येत आहे की, जालना एज्युकेशन सोसायटी, आर. जी. बगडिया कला एस. बी. लखोटिया वाणिज्य आणि आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय, जालना व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने दिनांक ०७ फेब्रुवारी २०१९ ते ११ फेब्रुवारी २०१९ दरम्यान १५ व्या राज्यस्तरीय गांधी विचार अभ्यास शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबीराचा विषय 'आजच्या संदर्भात गांधी व युवा' हा आहे. या शिबीरात याविषययाचे तज्ञ मार्गदर्शन व चर्चा करणार आहेत.

सदर शिबीरात आपल्या महाविद्यालयातील इच्छुक शक्यतो पदव्युत्तर विभागाचे रचनात्मक कार्य करु ईच्छिणाऱ्या निवडक १० विद्यार्थी (०५ विद्यार्थी व ०५ विद्यार्थीनी ) त्यांची माहिती रासेयो विभाग गोंडवाना विद्यापीठाकडे दिनांक ४ फेब्रुवारी २०१९ पर्यंत तात्काळ पाठवावे, सहभागी विद्यार्थांचा प्रवास खर्च महाविद्यालयाने करावे, ही विनंती.

डॉ. नरेश मडावी
संचालक (प्र)
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यपीठ,गडचिरोली

महात्मा गांधी अध्ययन केंद्र
(विद्यापीठ अनुदान आयोग व्दारा पुरस्कृत)

जालना एज्युकेशन सोसायटीचे
आर.जी.बगडिया कला,एस.बी.लखोटिया वाणिज्य आणि
आर.बेझंजी विज्ञान महाविद्यालय,जालना
**महात्मा गांधी अध्ययन केंद्र आयोजीत**
**१५ वे राज्यस्तरीय गांधी विचार अभ्यास शिबिर**

# आजच्या संदर्भात गांधी व युवा

**दिनांक ०७ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी २०१९**

मित्रहो,

सस्नेह नमस्कार !

आमच्या महाविद्यालयात मागील बारा वर्षांपासून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने महात्मा गांधी अध्ययन केंद्र सुरू आहे. युवकांमध्ये महात्मा गांधींच्या विचारांचा प्रचार-प्रसार व्हावा नि त्यांना रचनात्मक कार्याकडे वळवावे या उद्देशाने मागील चौदा वर्षांपासून सुट्ट्यांमध्ये महाविद्यालयीन युवक-युवतीसाठी राज्यस्तरीय गांधी विचार अभ्यास वर्गाचे आयोजन आम्ही करीत असतो.

यावर्षी दिनांक ०७ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी २०१९ दरम्यान 'आजच्या संदर्भात गांधी व युवा' या विषयावर १५ व्या राज्यस्तरीय अभ्यास शिबीराचे आम्ही आयोजन करीत आहोत.

दरवर्षी नवनवीन विषयांवर या शिबिराचे आयोजन केले जाते. आत्तापर्यंत रचनात्मक कार्य, ग्रामीण विकास, सत्याग्रही आंदोलने, विकासाचे खरे पर्याय, महात्मा गांधींचा मूल्य विचार, स्त्री-पुरूष सहजीवन, सामाजिक न्याय, गांधी विचारांसमोरील आव्हाने, गांधी आणि युवा, गांधी समजून घेतांना आदि संकल्पना घेऊन शिबिरे झाली आहेत.

या शिबिरामध्ये लवनमजी, पोपटराव पवार, मेधा पाटकर, डॉ.यशवंत सुमंत, अर्जुन डांगळे, कुमार प्रशांत, डॉ.उल्हास जाजू, सुनीती सू.र., विजयअण्णा बोराडे, डॉ.पारस बोरा, प्रा.संजय मंगला गोपाल, डॉ.सोमनाथ रोडे, मुकुंद दिक्षित, रमेश दाणे, डॉ.मु.ब. शहा, डॉ.सोहम पांडया, प्रतिभाताई शिंदे, डॉ.सुधीर गव्हाणे, ॲड.असिम सरोदे, अमरनाथभाई, डॉ.सच्चिदानंद, पर्यावरण तज्ज्ञ डॉ. विश्वंभर चौधरी(पुणे), डॉ. विश्वजीत रॉय (उडिसा) आदी अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले आहे.

या निमित्तानं महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातून आलेल्या युवक-युवतींच्या विचारांचे आदान-प्रदान होत असते. भारत भरातील अभ्यासक, वक्ते यांचे विचार ऐकायला मिळणार आहेत.

या शिबिरात जेष्ठ विचारवंत राज कुलकर्णी (उस्मानाबाद), पर्यावरण तज्ज्ञ डॉ. विश्वंभर चौधरी(पुणे), संजय आवटे (संपादक, दिव्य मराठी), गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव येथील भुजंग बोबडे, संकेत मुनोत (नोईग गांधीझम ग्लोबल फ्रेंडस पुणे), प्रेरणा देसाई (मुंबई), ज्ञानप्रकाश मोदानी (औरंगाबाद) मनोज ठाकरे (वर्धा) आदी मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे.

तेंव्हा उशीर कशाला आपली नोंदणी दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत मोबाईल अथवा ई-मेल द्वारे करावी म्हणजे पुढील सुविधेसाठी वेळ मिळेल. कृपया याची नोंद घ्यावी.

---

## ❊शिबिराचा तपशील❊

- **शिबिराचा कालावधी** : ०७ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी २०१९
- **शिबिर स्थळ** : जे.ई.एस.महाविद्यालय, जालना
- **नावनोंदणी** : दि.०२ फेब्रुवारी पर्यंत नोंदणी मोबाई अथवा ईमेलव्दारे yashsonune@gmail.com करावी.
- **शिबिराचा प्रारंभ** : ०७ फेब्रुवारी, २०१९ सकाळी ५.०० वाजता
- **शिबिराचा समारोप** : ११ फेब्रुवारी, २०१९, दुपारी ३.०० नंतर

**अन्य सूचना**

१. शिबिरार्थींनी दिनांक **०६ फेब्रुवारी, २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** शिबिर स्थळी पोहोचावे. उशीर होणार असेल तर तसे कळवावे.
२. शिबिर पूर्ण निवासी असल्याने व दिवसभर भरगच्च कार्यक्रम असल्याने या काळात नातेवाईकांकडे व अन्य परिचितांकडे जाण्याची अथवा अन्य कारणासाठी बाहेर जाण्यासाठी मोकळा वेळ असणार नाही. तशी परवानगी मागू नये, तसेच शिबिर काळात कोणास भेटण्यास सुध्दा बोलावू नये.
३. शिबिर काळात थंडीचे दिवस असल्यामूळे शिबिरार्थींनी पुरेसे गरम कपडे व पांघरूण सोबत आणावेत, योगासाठी आसनपट्टी आणावी.
४. सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यासाठी आवश्यक ते साहित्य सोबत आणावे.
५. भोजन व निवासाची सर्वसाधारण (शिबिरार्थींची)सोय संयोजकांच्या वतीने केली जाईल.
६. शिबिराचा समारोप झाल्याशिवाय कुणालाही सहभाग प्रमाणपत्र मिळणार नाहीत.

**संपर्कः**- डॉ.यशवंत सोनुने-मोः९४२२७२५३३०, yashsonune@gmail.com डॉ.महावीर सदावर्ते-मोः९८२३७३९७५९, डॉ. व्ही. बी. ऊगले :-९७६४२०८२७१ श्री गोविंद कुलकर्णी-मोः९१७५११९७२५ ०२४८२-२३४४२४.

जालना एज्युकेशन सोसायटीचे,
आर.जी.बगडिया कला, एस.बी. लखोटिया वाणिज्य आणि
आर.बेझंजी विज्ञान महाविद्यालय, जालना
**महात्मा गांधी अध्ययन केंद्र** आयोजीत
**१५ वे राज्यस्तरीय गांधी विचार अभ्यास शिबिर**

# आजच्या संदर्भात गांधी व युवा

**दिनांक ०७ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी २०१९**

## ✻ शिबिराचे वेळापत्रक✻

| वेळ | कार्यक्रम |
|---|---|
| सकाळी ५.०० ते ५.०५ | जागरण व रॅली पोष्ट |
| ५.०५ ते ५.४५ | प्रातःविधी |
| ६.०० ते ६.१५ | प्रार्थना |
| ६.१५ ते ७.१५ | योग व निसर्गोपचार |
| ७.१५ ते ७.४५ | सुबह का सच |
| ७.४५ ते ८.४५ | श्रमसंस्कार |
| ८.४५ ते १०.१५ | आंघोळ आणि न्याहरी |
| १०.१५ ते १०.३० | गीत वर्ग |
| १०.३० ते १२.३० | व्याख्यान व गटचर्चा |
| १२.३० ते १.३० | भोजन |
| १.३० ते २.०० | विश्रांती |
| २.०० ते २.३० | गीत वर्ग |
| २.३० ते ४.३० | व्याख्यान व गटचर्चा |
| ४.३० ते ५.३० | खेळ |
| ५.३० ते ६.०० | मुक्तवेळ |
| ६.०० ते ७.०० | चावडी |
| ७.०० ते ८.०० | भोजन |
| ८.०० ते ८.४५ | मूल्यांकन |
| ८.४५ ते ९.४५ | सांस्कृतिक कार्यक्रम |
| ९.४५ ते १०.०० | सर्वधर्म प्रार्थना |
| १०.०० | झोप |